No. MCS/205/2020-2022. R. N. I. Reg. No.MAHMAR 2006/19943

मुंबई, रविवार, ३ मार्च २०२४

# रविवार लोकसत्ता

WWW.LOKSATTA.COM

मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, छत्रपती संभाजीनगर आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

लोकमान्य, लोकशक्ती !

तापमान
कमाल ३३°से | किमान २२°से
हवामानाचा अंदाज
आकाश ढगाळ, पावसाची शक्यता.



लोकरंग
'डेटा'ग्रस्त समाज...







कविता राऊत मृत्यू-प्रकरणी चौकशी समिती / २

घराणेशाहीला निवडणुकीची भीती / ४

वसईत बसच्या धडकेत दोन मुली गंभीर जखमी / ५

पैशांचा पाऊस पाडण्याच्या प्रलोभनाने लैंगिक शोषण / ८

पाकिस्तानला जाणारी आण्विक सामग्री जप्त /१३

भाजपची पहिली यादी जाहीर; पंतप्रधान मोदी वाराणसीतून | मीनाक्षी लेखी यांच्यासह तीन मंत्र्यांना वगळले | ५७ ओबीसी तर ४७ युवा उमेदवार

# ३४ केंद्रीय मंत्री रिंगणात

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीसाठी भाजपने १६ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमधील १९५ उमेदवारांची पहिली यादी शनिवारी जाहीर केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा वाराणसीमधून, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दुसऱ्यांदा गांधीनगरमधून, तर संरक्षणमंत्री राजनाथ सिंह पारंपरिक लखनौमधून निवडणूक लढवतील. या यादीमध्ये ३४ मंत्री, दोन माजी मुख्यमंत्री, २८ महिला आणि सर्वाधिक ५७ ओबीसी उमेदवारांचा समावेश आहे.

दिल्लीत गुरुवारी पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत झालेल्या भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या बैठकीत प्रामुख्याने 'अ' आणि *(पान १३ वर)*

## जाहीर उमेदवार : १९५







- १६ राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेश
- **राज्यनिहाय उमेदवारांची संख्या :** उत्तर प्रदेश- ५१, पश्चिम बंगाल- २०, मध्य प्रदेश-२४, गुजरात-१५, राजस्थान-१५, केरळ-१२, तेलंगणा-०९, आसाम-११, झारखंड-११, छत्तीसगढ-११. दिल्ली-०५. जम्मू-काश्मीर-०२, उत्तराखंड-०३, अरुणाचल प्रदेश-०२, गोवा०१, त्रिपुरा-०१, अंदमान-निकोबार-०१, दीव-दमण-०१.
- ३४ केंद्रीय मंत्री, दोन माजी मुख्यमंत्री व लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांचा समावेश.
- २८ महिला उमेदवारांना प्राधान्य.
- ५० पेक्षा कमी वयोगटातील युवा ४७ उमेदवारांना संधी
- अनुसूचित जातीतील २७ तर अनुसूचित जमातीतील १८ उमेदवार.
- ओबीसी उमेदवार ५७.

## महाराष्ट्राचा समावेश नाही

भाजपने ज्या राज्यांमध्ये प्रादेशिक पक्षांशी आघाड्या केल्या आहेत, त्या राज्यांचा निवडणूक समितीच्या बैठकीत विचार करण्यात आला नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील एकाही उमेदवाराची घोषणा करण्यात आली नाही. समितीची पुढील बैठक ४-५ मार्च रोजी होणार आहे.

## कृपाशंकर उत्तर प्रदेशातून



महाराष्ट्रातील एकाही जागेवर उमेदवारांची घोषणा करण्यात आली नाही. महाराष्ट्रातील दिग्गज नेत्यांचा पहिल्या यादीत समावेश झालेला नसला तरी, पूर्वाश्रमीचे प्रदेश काँग्रेसचे नेते कृपाशंकर सिंह यांचे भाजपने पुनर्वसन केले असून त्यांना उत्तर प्रदेशमधील जौनपूरमधून उमेदवारी देण्यात आली आहे.

■ तेव्हा कारवाईची मागणी, आता उमेदवारी - पान २

# 'समृद्धी'वरील पुलाला भगदाड

### अमरावतीत महामार्गाची अवघ्या दीड वर्षातच दशा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**अमरावती :** नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील लोहोगावनजीकच्या पुलाला भगदाड पडल्याचे शनिवारी आढळले. त्यामुळे पुलाच्या बांधकाम दर्जाविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

महामार्गाजवळून काही शेतकरी पायी जात असताना पुलावरील काँक्रीट कोसळले. या घटनेत कुणालाही दुखापत झाली नाही. प्रशासनाला लगेचच या प्रकाराची माहिती देण्यात आली. प्रशासनाने भगदाडाभोवती *(पान १३ वर)*





समृद्धी महामार्गावरील अमरावतीतील लोहोगावनजीकच्या पुलाला भगदाड पडल्याने वाहतूक वळवण्यात आली आहे.

## इगतपुरी तालुक्यात उद्घाटनास विरोध

**नाशिक :** समृद्धी महामार्गालगतची इगतपुरी तालुक्यातील कामे अपूर्ण असताना लोकार्पणाची घाई का, असा प्रश्न शेतकऱ्यांनी तळोशी येथे झालेल्या बैठकीत उपस्थित केला. गावांना जोडणारे रस्ते, रस्त्याची दुरुस्ती इत्यादी अनेक कामे अपूर्ण असल्याचे शेतकऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणले.

## मोटरमनच्या ३० टक्के जागा रिक्त

**मुंबई :** मध्य रेल्वेच्या मुंबई विभागात मोटरमनच्या ३० टक्के जागा रिक्त असल्याने उर्वरित मोटरमनवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असल्याचे स्पष्ट झाले आहे. मुंबई विभागात मंजूर १,०७६ पदांपैकी ३१३ पदे रिक्त असून फक्त ७६३ मोटरमन कार्यरत आहेत. परिणामी, दररोजच्या १,८०१ लोकल फेऱ्यांचा अतिरिक्त ताण त्यांच्यावर येत असल्याचे रेल्वे कर्मचारी संघटनेचे म्हणणे आहे. - पान ५

## मुंबई महापालिकेत ५२ हजार पदे रिक्त

**मुंबई :** मुंबई महापालिकेत कामगार, कर्मचाऱ्यांची ५२ हजारांहून अधिक पदे रिक्त आहेत. एकूण एक लाख ४५ हजारांहून अधिक पदे मंजूर असून त्यापैकी केवळ ९२ हजार पदांवर कामगार, कर्मचारी कार्यरत आहेत. - पान ३






# मुंबई महापालिकेत ५२ हजार पदे रिक्त

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई** : मुंबई महापालिकेत कामगार, कर्मचाऱ्यांची तब्बल ५२ हजारांहून अधिक पदे रिक्त असल्याचे उघडकीस आले आहे. पालिकेत एकूण एक लाख ४५ हजारांहून अधिक पदे मंजूर असून त्यापैकी केवळ ९२ हजार पदांवर कामगार, कर्मचारी कार्यरत असल्याचे माहिती अधिकारातून पुढे आले आहे.

मुंबईतील लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत असली तरी मुंबई महापालिकेतील कामगार, कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने कामगार, कर्मचारी सेवानिवृत्त होत असून त्यांची पदे भरली जात नसल्यामुळे रिक्त पदांची संख्या वाढत आहे. सव्वाकोटी लोकसंख्येला नागरी सेवा देणाऱ्या मुंबई महापालिकेत तब्बल १२९ खाती आहेत. त्यातील काही विभाग अत्यावश्यक सेवेत येतात. नागरिकांना सेवा देण्यासाठी नवीन विभाग तयार करण्यात आले असले तरी त्यासाठी लागणारे मनुष्यबळ भरती केले जात नाही.

सेवानिवृत्ती, कामगारांच्या मृत्यूमुळे रिक्त पदांची संख्या दरवर्षी वाढत आहे. गेली अनेक वर्षे भरती न झाल्यामुळे सुमारे ५२ हजारांहून अधिक पदे रिक्त असल्याचे माहिती अधिकारातून पुढे आली आहे. ही पदे तत्काळ भरावीत, अशी मागणी कर्मचारी कामगार सेनेने केली आहे.

## आयुक्तांना कर्मचारी कामगार सेनेचे पत्र

महापालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांना पत्र पाठवून रिक्त पदे भरण्याची मागणी म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेचे उपाध्यक्ष संजय बापेरकर यांनी केली आहे. रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने भरली जात असली तरी दैनंदिन स्वरूपाचे व अत्यावश्यक पद्धतीचे काम कंत्राटी कामगारांकडून करून घेतले जात असून ते उचित नाही, असेही या पत्रात म्हटले आहे.

> पालिका कर्मचाऱ्यांच्या एका वारसाला पालिकेच्या सेवेत घ्यावे. कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्यांचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना पदावर कायम करावे. तसेच रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू करावी.
> - बाबा कदम,
> अध्यक्ष, म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेना

# विरार – सुरतदरम्यान आज ब्लॉक

**मुंबई** : पश्चिम रेल्वेवर मिशन रफ्तार प्रकल्पाचे काम सुरू असून मिशन रफ्तारअंतर्गत मुंबई - सुरत - वडोदरा - दिल्ली आणि मुंबई - वडोदरा - अहमदाबाद या विभागांवर ताशी १६० किमी वेगाने रेल्वेगाड्या धावण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. या प्रकल्प कामासाठी विरार - सुरतदरम्यान ब्लॉक घेण्यात येणार आहे. रविवारी सकाळी ९.१० ते १०.३० दरम्यान हा ब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे काही लोकल आणि रेल्वेगाड्यांवर परिणाम होणार आहे.

ब्लॉक कालावधीत गाडी क्रमांक १२९३४ अहमदाबाद - मुंबई सेंट्रल कर्णावती एक्स्प्रेस रविवारी २५ मिनिटे विलंबाने धावेल. तर, सकाळी ७.१७ ची चर्चगेट - डहाणू रोड लोकल वाणगावपर्यंत तर सकाळी ९.३७ वाजेची डहाणू रोड-विरार लोकल डहाणू रोडऐवजी वाणगाववरून सकाळी ९.५० वाजता सुटेल. ७.४२ ची चर्चगेट - डहाणू रोड लोकल वाणगावपर्यंत चालवण्यात येईल.

# दहिसर येथे सिमेंट मिक्सरने ६ वर्षांच्या मुलाला चिरडले

लोकसत्ता खास प्रतिनिधी

**मुंबई**: पश्चिम द्रुतगती मार्गावर दहिसर चेकनाक्याजवळ सिमेंट मिक्सरने सहा वर्षांच्या मुलाला चिरडल्याची घटना शुक्रवारी घडली. सिमेंट मिक्सरचालकाने दुचाकीला धडक दिली.

याप्रकरणी दहिसर पोलिसांनी सिमेंट मिक्सरचालकाविरोधात गुन्हा दाखल केला. तक्रारदार सीमा गुप्ता (४२) या मीरा रोड येथील रहिवासी आहेत. त्या कांदिवली येथील साई रुग्णालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून काम करतात. त्या आपला मुलगा नकुल गुप्ता (६) याच्यासह दुचाकीवरून जात होत्या. त्यावेळी सिमेंट मिक्सरचालकाने अचानक डाव्या बाजूला वळन घेत दुचाकीला धडक दिली.

# साकीनाका येथे गोदामाला आग

**मुंबई** : अंधेरी- कुर्ला मार्गावरील साकीनाका परिसरातील एक मजली गोदामाला सकाळी ९ च्या सुमारास आग लागली. या आगीमध्ये १५ हजार चौरस फुटांवरील जागेतील लाकडी सामान, कपडे, यंत्रसामग्री, कागदाचे गठ्ठे जळून खाक झाले.

साकीनाका परिसरात जरीमरी बस स्टॉप परिसरात असलेल्या दोन गाळ्यांना अचानक आग लागली. या आगीचे कारण समजू शकलेले नाही.









